देशपांडे सर

# भाग- नऊ

# महाराष्ट्र जमीन महसूल (झाडे, ई. बाबत हक्कांचे नियम करण्याबाबत) नियम, १९६७

## सुधारणा सरकारी नियम युएनएफ १५६७ (बी)-आर-दिनांक ४-७-६८.

क्रमांक युएनएफ १५६७-बी-आर-१-९-६७- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्राचा एक्केचाळीसावा) याच्या कलम ३२८ पोट-कलम (२), खंड (६) व ६३; व कलम ३२९ पोट-कलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि या बाबतीत करण्यात आलेले व सदर अधिनियमाच्या कलम ३३६ च्या तिसऱ्या परंतुकाच्या आधारे अंमलात असण्याचे चालू राहिलेल्या सर्व पूर्वीच्या ३३६ नियमांचे अधिक्रमन करून, महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करीत आहे. हे नियम सदर अधिनियमाच्या कलम ३२९ च्या पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले होते.

**१. संक्षिप्त नाव :**

या नियमांना महाराष्ट्र जमीन महसूल (झाडे इत्यादीच्या बाबतीतील हक्कांचे नियम करण्याबाबत) नियम, १९६७ असे म्हणावे.

### अ. जमीन धुपण्यास प्रतिबंध करण्यासाठी झाडे तोडण्याचे नियमन

**२. विवक्षित बाबतीत झाडे तोडण्यास मनाई :**

(१) पाण्याचा कोणताही प्रवाह, झरा किंवा तलाव याच्या किनाऱ्याच्या सर्वात बाहेरच्या काठापासून तीस मीटरच्या आतील झाडे, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीखेरीज तोडता कामा नये.



Scanned with CamScanner

(२) पोट-नियम एक मध्ये समावेश न होणाऱ्या बाबतीत, लागवडीसाठी अयोग्य असलेल्या जमिनीच्या बाबतीत किंवा जेथे शेतीच्या पिकाचे आर्थिकदृष्ट्या परवडणारे उत्पादन करणे शक्य नसेल अशा जमिनीच्या बाबतीत अशा जमिनीतील किंवा तिच्या भागातील झाडे एक एकरात वीस झाडांहून कमी असतील अशा प्रसंगी जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीखेरीज ती तोडता कामा नये.

(३) या नियमाचा भंग करणाऱ्या कोणत्याही इसमास, अशा भंग केल्यामुळे होणाऱ्या इतर परिणामाखेरीज, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा एक हजार रूपयाहून अधिक नाही इतक्या दंडास पात्र असेल. परंतु अशा दंडाची आकारणी करीताना संबंधित इसमास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याखेरीज तो आकारता कामा नये.

**स्पष्टीकरण १-** या नियमांच्या प्रयोजनासाठी 'पाण्याचा प्रवाह' यामध्ये ज्यात पावसाळ्यात किंवा अन्यथा पाणी साठते व बहुधा ज्यात डिसेंबर अखेरपर्यंत पाणी राहते असे सर्व ओढे, नद्या, ओहोळ व नाले यांचा समावेश होतो; परंतु त्यात पावसाळ्यात पाणी वाहण्यामुळे तयार झालेल्या लहान तात्पुरत्या जलमार्गांचा समावेश होत नाही.

**स्पष्टीकरण २ -** कोणतेही झाड, प्रवाह, झरा किंवा तलाव यांच्या किनाऱ्याच्या सर्वात बाहेरच्या काठापासून तीस मीटरच्या आत आहे किंवा नाही, किंवा कोणती जमीन किंवा तिचा भाग लागवडीमध्ये नाही किंवा जेथे शेतीच्या पिकाचे आर्थिकदृष्ट्या परवडणारे उत्पादन करणे शक्य नाही, याबद्दल प्रश्न उपस्थित झाल्यास जिल्हाधिकाऱ्याकडे निर्णयार्थ सोपविला पाहिजे.

३. **अशी झाडे तोडण्यास केव्हा परवानगी देता येईल :**

जमीनधारकाने त्या बाबतीत अर्ज केल्यावर नियम २ मध्ये निर्दिष्ट केलेली-

(१) झाडे किंवा त्यांचे भाग यामुळे जीवितास किंवा मालमत्तेस कोणतीही इजा किंवा नुकसान पोहोचण्याची शक्यता असेल किंवा पिण्याचे पाणी दूषित होण्याची शक्यता असेल; किंवा

(२) झाडे वटलेली असतील किंवा वटत असतील; किंवा

Scanned with CamScanner

(३) नियमित अन्नधान्याच्या पिकाखालील लागवडीयोग्य जमिनीवर अशा झाडांची सावली पडल्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनाच्या बाबतीत घट येते त्या बाबतीत झाडे काढून टाकणे हे जमीनधारकाच्या हिताचे ठरत असेल तर अशी झाडे तोडण्यास जिल्हाधिकाऱ्यास परवानगी देता येईल.

**ब. भोगवट्यात असलेल्या जमिनीतील झाडांच्या खरेदीसाठी कार्यपद्धती:**

**४. झाडाबाबतचे हक्क खरेदी करण्यासाठी अर्ज :**

भोगवटदाराने धारण केलेल्या जमिनीतील झाडाबाबतच्या हक्क खरेदी करण्याची आणि कलम २५ पोट-कलम (२) अन्वये अशा हक्काचे मूल्य ठरविण्याची त्याची इच्छा असेल त्या बाबतीत त्याने झाडांची संख्या व जाती आणि झाडांबाबतचे हक्क या संबंधी कलमातील तरतुदीनुसार अर्ज केला पाहिजे. त्यासोबत धारण केलेल्या जमिनीसंबंधीच्या क्षेत्र- पुस्तकाची (खासरा) एक प्रत किंवा झाडाबाबतचे विद्यमान हक्क दाखविण्याचा आशय असलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजाच्या उताऱ्याची एक प्रत जोडली पाहिजे.

**५. अर्ज मिळाल्यानंतरची कार्यपद्धती :**

(१) अर्ज मिळाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याने झाडाबाबतचे हक्क निहित असलेल्या सर्व इसमांवर नोटीस बजावण्याची आणि ह्या नियमांना जोडलेल्या नमुना 'अ' मध्ये उद्घोषणा काढण्याची व्यवस्था केली पाहिजे व त्याद्वारे अशा हक्काच्या खरेदीविरूद्ध हितसंबंधित इसमाच्या ज्या कोणत्याही हरकती असतील त्या दाखल करण्यासाठी त्यांना फर्माविले पाहिजे.

(२) अशी नोटीस कलम ३३० च्या उपबंधानुसार बजावण्यात येईल आणि अशी उद्घोषणा कलम १९२ पोट-कलम (२) च्या उपबंधानुसार काढण्यात येईल.

**६. अर्जासंबंधी चौकशी :**

(१) सुनावणीसाठी ठरविलेल्या तारखेस किंवा सुनावणी ज्या तारखेपर्यंत तहकूब करण्यात आली असेल अशा इतर कोणत्याही तारखेस, जिल्हाधिकारी, पक्षकाराची तपासणी केल्यानंतर आणि सादर करण्यांत येईल अशा कोणत्याही पुराव्याच्या सुनावणीनंतर आदेश देईल व त्यात पुढील गोष्टी नमूद करील-

Scanned with CamScanner

(१) झाडाची संख्या आणि वर्णन;

(२) हक्कांचे मूल्य; आणि

(३) अशा रीतीने ठरविलेले मूल्य ज्या कालावधीत देण्यात येईल असा वीस दिवसाहून कमी नसेल असा कालावधी व भोगवटदाराने ती रक्कम ज्या इसमाला द्यावयाची तो इसम.

(२) ठरविलेल्या तारखेस भोगवटदाराने रक्कम भरण्यात किंवा अशा भरणा केल्याबद्दल पावती सादर करण्यात कसूर केल्यास, असे हक्क खरेदी करण्याचा त्याचा विचार नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर जिल्हाधिकारी, नियम ५ अन्वये नोटीस व उद्घोषणा काढण्यासाठी आणि चौकशी करण्यासाठी केलेला खर्च ठरवील आणि अशा रीतीने ठरविलेला खर्च भोगवटदारास द्यावा लागेल.

**७. आदेशाची प्रत तलाठ्यास पाठविणे :**

भोगवटदाराने झाडांच्या किंमतीची रक्कम भरल्याची पावती सादर केल्यावर जिल्हाधिकारी, नियम ६ अन्वये दिलेल्या आदेशाची प्रत, अभिलेखात आवश्यक त्या नोंदी करण्यासाठी तलाठ्याकडे पाठवील.

**नमुना अ**

( नियम ५ )

**उद्घोषणा**

ज्याअर्थी, ... राहणार ... तालुका..., यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) याचे कलम २५ पोट-कलम (२) अन्वये खालील अनुसूचित वर्णन केल्याप्रमाणे, त्याने धारण केलेल्या जमिनीतील झाडाबाबतचे हक्क खरेदी करण्यासाठी अर्ज केलेला आहे. त्याअर्थी, सर्व हितसंबंधित इसमांना याद्वारे कळविण्यात येते की, खाली सही करणारे आपल्या कार्यालयात... या दिवशी..... वाजता त्या अर्जाची तपासणी करतील. ज्या कोणत्याही इसमास दावा करावयाचा असेल किंवा हरकत घ्यावयाची असेल त्याने त्यावेळी तसे करावे.

Scanned with CamScanner

## अनुसूची

| अनु-क्र. | गावाचे नाव व तालुका | भूमापन क्रमांक- | क्षेत्रफळ प्लॉट क्रमांक | झाडांची संख्या व जाती | झाडाबाबत अधिकार ज्या इसमाकडे निहित असतील त्या इसमांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

दिनांक 19

जिल्हाधिकारी.

❖❖❖